विक्रीकर आयुक्त महाराष्ट्र राज्य
मुंबई यांचे कार्यालय, ८ वा मजला,
नवीन इमारत, विक्रीकर भवन,
माझगांव, मुंबई - ४०० ०१०.

संदर्भ: - कार्यालयीन आदेश क्र. विविआ/२०१५/आस्था-३/पुनर्रचना कक्ष/फेररचना/अपिले कार्यभार/प्र.क्र.७६ दि. २८/११/२०१६

## शुध्दीपत्रक

क्रमांकः- विविआ/२०१५/आस्था-३/पुनर्रचना कक्ष/फेररचना/अपिले कार्यभार/प्र.क्र.७६ मुंबई, दिनांक ३०/११/२०१६.

उपरोक्त संदर्भाधिन आदेशातील परिच्छेद २.१ मध्ये, हे कार्यालयीन आदेश निर्गमीत झाल्याच्या दिनांकापासुन विक्रीकर अधिकारी व सहायक विक्रीकर आयुक्त यांनी पारित केलेल्या निर्धारणा आदेशांविरुध्दचे नव्याने दाखल करण्यात येणारे अपील त्या अधिकाऱ्यांच्या संबंधीत नियंत्रक विक्रीकर उपायुक्तांकडे तर विक्रीकर उपायुक्त यांनी पारित केलेल्या निर्धारणा आदेशांविरुध्दचे अपील त्या अधिकाऱ्यांच्या संबंधीत नियंत्रक विक्रीकर सहआयुक्त यांचेकडे दाखल करण्यात यावे असे निर्देश देण्यात आले होते.

या ऐवजी विक्रीकर अधिकारी व सहायक विक्रीकर आयुक्त यांनी पारित केलेल्या निर्धारणा आदेशांविरुध्द दि. ०१/१२/२०१६ नंतर नव्याने दाखल करावयाची अपीले त्या अधिकाऱ्यांच्या संबंधीत नियंत्रक विक्रीकर उपायुक्तांकडे तर विक्रीकर उपायुक्त यांनी पारित केलेल्या निर्धारणा आदेशांविरुध्द दि. ०१/१२/२०१६ नंतर नव्याने दाखल करावयाची अपीले त्या अधिकाऱ्यांच्या संबंधीत नियंत्रक विक्रीकर सहआयुक्त यांचेकडे दाखल करण्यात यावे असे निर्देश देण्यात येत आहे.

अपिल दाखल करण्याच्या नवीन कार्यपध्दती बाबत नियंत्रक अपर विक्रीकर आयुक्त तसेच विक्रीकर सहआयुक्त यांनी अधिकारी / कर्मचारी यांना मार्गदर्शन करावे जेणेकरुन व्यापाऱ्यांची गैरसोय होणार नाही.

**विक्रीकर आयुक्त**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई**

प्रत :-

१. विशेष विक्रीकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. मुख्य दक्षता अधिकारी, मुंबई.
३. अप्पर विक्रीकर आयुक्त, मुंबई- १, २, ३, ४/ठाणे/नाशिक/कोल्हापुर/नागपुर/ठाणे.
४. सर्व विक्रीकर सहआयुक्त.
५. आयुक्तांच्या कार्यालयातील सर्व कार्यासने.
६. सर्व विक्रीकर उपायुक्त, सहायक विक्रीकर आयुक्त आणि विक्रीकर अधिकारी.
७. सर्व आस्थापना अधिकारी.
८. निवडनस्ती.
९. स्थळप्रत.